वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.३ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# कोण होणार बीडचा नगराध्यक्ष ?



**फारूक पटेल, अमर नाईकवाडे, विनोद मुळूक, शेख निजाम, शेख तय्यब, डॉ.योगेश क्षीरसागर, ॲड.शेख शफिक, सलिम जहाँगिर, नवनाथ शिराळे, अशोक लोढा, सलाम शेठ की शेख मतीन**

**सोमवारी होणार फैसला**

बीड, (दिव्य न्युज):- राज्याचे नगरविकास विभागाच्या उपसचिव प्रियंका कुलकर्णी यांनी आज एक आदेश काढला. या आदेशात राज्यातील नगर परिषद, नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत सोमवार दि.६ ऑक्टोंबर २०२५ रोजी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर ही सोडत आयोजित करण्यात आलेली आहे. आता पासूनच अनेकजण गुडघ्याला बाशींग बांधून तयार झाले असून अन् अनेकांच काळीज दुपारपासून धडधड करू लागले की आपल्या नगर पालिकेचा नगराध्यक्ष पदाचे आरक्षण काय निघते? सोमवारीच अनेक नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाचा निकाल अर्धा लागणार आहे. कारण, सर्वच समाजाचे आणि सर्वच जातीचे पुढारी गुडघ्याला बाशींग बांधून नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढण्यासाठी तयार आहेत. प्रत्येकाची इच्छा आहे की आपणच नगर पालिकेचा नगराध्यक्ष व्हावा यासाठी अनेक गट तट तयार करण्यात आलेले आहेत. सर्व इच्छूक आप आपल्या पक्षाकडे, संघटनेकडे आणि आघाडीकडे आपल्यालाच ▸▸ पान २ वर

# तुझ्यामुळे अजित पवारांचा पण कार्यक्रम लावीन

## रक्ताने हात माखलेल्यांनी माझ्या जातीवर बोलायचे नाही

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

**दिव्य वार्ता**





**मनोज जरांगे पाटलांची धनंजय मुंडेवर जोरदार टीका**

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- मराठा नेते, मनोज जरांगे-पाटील यांनी शेतकरी आणि गॅझेट संदर्भात सरकारला अल्टिमेटम दिला आहे. मराठा आरक्षणाबद्दल जरांगे-पाटील यांनी परत एकदा सरकारला सुचना केल्या आहेत. आज (३ ऑक्टोबर) पत्रकार परिषद घेत सरकाराकडे मागण्या केल्या आहेत. यावेळी त्यांनी राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांच्यावर देखील टीका केली आहे. धनंजय मुंडे म्हणाले म्हणाले होते की, मराठा समजाला आरक्षण दिलं, याचा आनंद आहे. पण ओबीसीमधून देऊ नका त्यांना ओबीसीतून का हवं? या विधानावर प्रश्न विचारला असता जरांगो पाटील म्हणाले, तुम्ही का घेतलं बंजारा समाजातून? नाही घ्यायच, कशाला घेतलं? कशाला लोकांच्या काड्या करतो. मला काय बोलतो हेकन्या, आम्ही ओबीसीच खातो, मग तू बंजारा समाजाच का खातो? तू दिसतो का त्यांच्यासारखा? अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडेंवर टीका केली.

धनंजय मुंडे यांच्यावर बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, तुम्ही कशाला बंजारा समाजातून आरक्षण ▸▸ पान २ वर

# चिमुकल्याला पाण्याच्या बॅरेलमध्ये टाकून वडिलांची आत्महत्या



तलवाडा (दिव्य न्युज):- चार महिन्याच्या चिमुकल्या मुलाला पाण्याच्या बॅरलमध्ये टाकून वडिलांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना आज पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास तलवाडा तहत रामनगर (ता.गेवराई) येथे घडली. पित्याने एवढ्या निर्दयीपणे चिमुकल्याची हत्या केल्याच्या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान सदरील घटनेचे कारण अद्याप समोर आले नसले तरी चार दिवसांपुर्वी घरगूती वादातून पती-पत्नीने विष प्राशन केले होते. दसऱ्याच्या दिवशीच ते उपचार घेऊन घरी परतले होते. गेवराई तालुक्यातील तलवाडा तहत रामनगर येथील अमोल हौसराव सोनवणे व पायल अमोल सोनवणे या पती-पत्नीत चार दिवसांपुर्वी वाद झाला होता. त्यांनी विष प्राशन केल्याने त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. दि.२ ऑक्टोबर रोजी उपचार घेऊन दोघे घरी परतले होते. आज दि.३ रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास अमोल हौसराव सोनवणे (वय ३०) याने आपल्या चार महिन्याच्या मुलाला पाण्याच्या बॅरलमध्ये टाकले. बॅरलमध्ये पाणी असल्याने चिमुकल्याचा मृत्यू झाला. त्यानंतर अमोल सोनवणे याने स्वत: देखील घरासमोरील अंगणात पत्र्याच्या आडूला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. यावेळी अमोलची पत्नी पायल ही झोपेत होती. सदरील घटना उघडकीस येताच अमोल सोनवणेसह चार महिन्याच्या बाळाला शवविच्छेदनासाठी तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. सदरील घटनेची माहिती कळताच तलवाडा ठाण्याचे सपोनि मनोज निलंगेकर, पोउपनि कैलास अनालदास, बीट अंमलदार पो.ह.शेख मोहसीन, पो.ह.नारायण काकडे, चालक पवन शेळके यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# शिक्षणाधिकारी फुलारी साहेब, इंग्रजी शाळांमध्ये चाललंय काय?

**ज्ञानेश्वर पब्लिक स्कुलमधील प्राचार्या अरोरा यांच्या राजीनाम्यानंतर विद्यार्थ्यांचे शाळेतच आंदोलन तर एम.एस.इंग्लिश स्कुलमधील प्राचार्यासह सात शिक्षकांच्या राजीनामे; पालकांचा गोंधळ**





बीड (दिव्य न्युज):- शहरातील इंग्लीश स्कुलमध्ये गेल्या काही दिवसांपासून प्रचंड अनागोंदी सुरू आहे. कधीही शिक्षकांची नियुक्ती करणे, काही दिवसातच त्यांना काढून टाकणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. त्यातच आता काही महिला शिक्षकांनी थेट संस्था चालकांविरूध्द मानसिक छळाचे आरोप केल्याने खळबळ ▸▸ पान २ वर

# पोलीस दुसऱ्याची बायको घेवून फिरता होता

**महिलेच्या पतीने केला राडा, शिवाजी महाराज चौकात बघ्याची चंगळ**

बीड, (दिव्य न्युज):- आपल्या सोबत न नांदता एका पोलिसासोबत चार चाकी गाडीमध्ये पत्नी फिरतांना पाहून संतापलेल्या पतीने थेट रस्त्यावरच राडा केल्याची घटना आज दुपारी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात घडली. यामुळे काही काळ वाहतूक पुर्णत: ठप्प झाली होती. बघ्यांनी तोंबा गर्दी केल्याचे पाहून घटनास्थळी वाहतूक पोलिसांसह अन्य पोलिस पाहंचले. पोलिसांकडूनच व्याधीचार होत असल्याने या घटनेची जोरदार चर्चा होत असून राडा करणारा नवरा संबंधित महिला आणि महिलेला फिरवणारा पोलीस या तिघांना ▸▸ पान २ वर

# शेतकरी पतीच्या आत्महत्येनंतर मिळालेली शासकीय आर्थिक मदत सायबर भामट्यांनी लुटली

बीड, (दिव्य न्युज):- तालुक्यातील हिंगणी येथील शेतकरी विधवा महिलेच्या नावावरील पोस्ट पेमेंट बँक खात्यातील तब्बल १ लाख ३३ हजार ९९५ रुपये अज्ञात सायबर गुन्हेगारांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. या प्रकरणी मिनाक्षी दत्ता आंधळे (वय ४०) यांनी बीड सायबर पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दाखल केली आहे.मिनाक्षी आंधळे या दोन मुलांसह राहत असून मोलमजुरी करून उपजीविका भागवतात. त्यांच्या पतीने मागील वर्षी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळालेला पान २ वर




# तळेगाव शिवारात तरूणाची गळफास घेवून आत्महत्या



बीड, (दिव्य न्युज):- बीड पासून काही अंतरावर असलेल्या तळेगाव शिवारातील एका २१ वर्षीय तरूणाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना काल घडली. या तरूणाची ओळख पटली असून सदरील हा तरूण बालेपीर येथील असल्याचे पोलीस प्रशासनाने सांगितले.


तळेगाव शिवारातील एका झाडाला गळफास घेतलेला मृतदेह आढळून आला होता. सदरील हा मृतदेह जिल्हा रूग्णालयामध्ये आणण्यात आला होता. प्रथम मयताची ओळख पटली नव्हती. मात्र त्यानंतर ओळख पटली असून तो इरफान सलीम पठाण (रा.बालेपीर ) असल्याचे निष्पन्न झाले. त्याने कोणत्या कारणावरून आत्महत्या केली हे मात्र समजू शकले नाही. या प्रकरणाचा अधिक तपास बीड ग्रामीण पोलीस करत आहेत.

# गेवराईत शेतकऱ्याने गळफास घेऊन जीवन संपवले

गेवराई, (दिव्य न्युज):- तरूण शेतक-याने गळफास घेऊन जीवन संपविल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि.१) सकाळी गेवराई शहरातील शिवाजीनगर भागात उघडकीस आली. संतोष महादेव चोपडे (वय ३३, रा. रामपुरी, सध्या रा. गेवराई (शिवाजीनगर) असे मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. दरम्यान, या घटनेचे कारण समजू शकलेले नाही.

दोन एकर शेतजमिनीत कुटुंबियाची उपजीविका होत नसल्याने संतोष याने शेतीवर कर्ज काढून रिक्षा घेतली. रिक्षा घेतल्यानंतर तो गेवराई शहरातील शिवाजीनगर भागात स्थायिक झाला होता. रिक्षातून मिळत असलेल्या पैशातून तो कुटुंबाचा ▸▸ पान २ वर

# बायबल आणि कुराणमध्ये ज्या पर्वताला 'देववाणी' झाली ते केंद्र वादाच्या भोवऱ्यात






वर्षानुवर्षे पर्यटक त्यांच्या बदायून गाईडबरोबर माउंट सिनाई चढून जातात. तिथे जाऊन ते सुंदर, स्वच्छ, खडकाळ भूप्रदेशावरून सुर्योदय पाहतात. बदायून गाईडच्या मार्गदर्शनाखाली ते इतरत्रही भटकंती करतात.माउंट सिनाई हे ज्यू, ख्रिश्चन आणि मुस्लीम समुदायांमध्ये पवित्र मानलं जातं, ते श्रद्धेचं ठिकाण आहे. ते आता इजिप्तमधील सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे. मात्र हे पवित्र ठिकाण त्याचं रूपांतर एका नवीन प्रचंड पर्यटन प्रकल्पात करण्याच्या योजनेवरून वादाच्या केंद्रस्थानी आलं आहे.

माउंट सिनाई किंवा सिनाई पर्वत स्थानिक लोकांमध्ये जबल मुसा म्हणून ओळखला जातो. याच ठिकाणी मोझेसनं (मोशे) १० कमांडमेंट म्हणजे आज्ञा दिल्याचं मानलं जातं. अनेकांचा असाही विश्वास आहे की बायबल आणि कुराणनुसार, याच ठिकाणी अल्लाह जळत्या झुडुपातून पैगंबरांशी बोलला होता.तिथे ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चकडून संचालित ६ व्या शतकातील सेंट कॅथरीन मठदेखील आहे. ग्रीक दबावाखाली इजिप्तमधील अधिकाऱ्यांनी हा मठ बंद करण्याची योजना असल्याचं नाकारलं आहे. त्यामुळे आता या मठातील संन्यासी तिथेच राहतील असं दिसतं.

हे युनेस्कोच्या यादीतील जागतिक वारसा स्थळ देखील आहे. मात्र मठ, शहर आणि पर्वत यांचा समावेश असलेल्या आणि दीर्घकाळापासून अलिप्त असलेल्या वाळवंटातील या ठिकाणाचं रूपांतर आता कशात होतं आहे याबद्दल अजूनही मोठी चिंता आहे. तिथे आता आलिशान हॉटेल, व्हिला आणि शॉपिंग मार्केट बांधलं जातं आहे.इथं जेबेलेया जमात या पारंपारिक बदायून समुदायाचं वास्तव्यदेखील आहे. सेंट कॅथरीनचे संरक्षक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जमातीची आधीपासून तिथं ज्या प्रकारचा विकास हवा आहे, ते विकासाकडे ज्याप्रकारे पाहतात तसा हा विकास नाही. स्थानिक समुदायाच्या हितांचं दमन करून बाहेरच्या लोकांच्या हितसंबंधांसाठी वरून खालपर्यंत लादण्यात आलेला हा विकास आहे, असं दिसतं, असं बेन यांनी बीबीसीला सांगितलं.

पारंपारिकरीत्या भटक्या समजल्या जाणाऱ्या बदायून जमातीभोवती एक नवीन शहरी जग बांधलं जातं आहे. बदायून समुदाय याप्रकारच्या जगापासून लांब, अलिप्त राहत आला आहे. या बांधकामाला त्यांनी संमती दिलेली नाही आणि या प्रकल्पामुळे त्यांच्या मातृभूमीतील त्यांचं स्थान कायमचं बदलणार आहे, असं बेन पुढे म्हणाले.आतापर्यंत, इजिप्तमधल्या या योजनेबद्दल इतर देशांमध्ये ग्रीक हा देश सर्वाधिक बोलतो आहे. कारण माउंट सिनाईवरील मठाशी त्यांचा संबंध आहे.सेंट कॅथरीन हा सातत्यानं वापरात असलेला जगातील सर्वात जुना ख्रिश्चन मठ आहे. मे महिन्यात इजिप्तमधील न्यायालयानं सेंट कॅथरीन सरकारी जमिनीवर असल्याचा निकाल दिला. त्यानंतर इजिप्त आणि ग्रीस या दोन देशांमधील तणाव वाढला.

कित्येक दशकांपासूनच्या वादानंतर, न्यायाधीशांनी सांगितलं की मठ ज्या जमिनीवर आहे आणि त्याच्या अवतीभोवतीच्या पुरातत्वीय धार्मिक स्थळांचा 'वापर करण्याचा अधिकार' मठाला आहे.अथेन्सचे आर्चबिशप इरोनिमॉस द्वितीय ग्रीसमधील चर्चचे प्रमुख आहेत. त्यांनी न्यायालयाच्या या निकालाचा लगेचच निषेध केला.मठाची मालमत्ता जप्त केली जाते आहे. ऑर्थोडॉक्सी आणि हेलेनिझमच्या या अध्यात्मिक दीपस्तंभाला अस्तित्वाचा धोका आहे, असं त्यांनी एका वक्तव्यात म्हटलं आहे.

सेंट कॅथरीनचे प्रदीर्घ काळापासूनचे आर्चबिशप डॅमियानोस यांनी एका दुर्मिळ मुलाखतीत एका ग्रीक वृत्तपत्राला सांगितलं की या निकालानं आम्हाला प्रचंड धक्का बसला...आणि तो आमचा अपमान आहे.न्यायालयाच्या निकालाबाबत त्यांनी ही भूमिका घेतल्यामुळे धर्मगुरूंमध्ये कटुता निर्माण झाली. त्यातून त्यांनी अलीकडेच त्यांचं पद सोडण्याचा निर्णय घेतला.जेरसलेममधील ग्रीक ऑर्थोडॉक्स पॅट्रिआर्चेटनं निदर्शनास आणलं की चर्चच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या या पवित्र स्थळाला स्वत: मोहम्मद पैगंबर यांनी संरक्षणाचं पत्र दिलं होतं.त्यात म्हटलं आहे की बायझंटाईन मठ हा ख्रिश्चन आणि मुस्लीम समुदायांमधील शांततेचं पवित्र केंद्र आणि संघर्षानं भरलेल्या जगासाठी आशेचं आश्रयस्थान होतं. बायझंटाईन मठात फातिमिद काळात बांधलेली एक छोटी मशीददेखील आहे.

न्यायालयानं दिलेला वादग्रस्त निकाल कायम असतानाच, शेवटी ग्रीक आणि इजिप्तमध्ये झालेल्या मुत्सद्देगिरीच्या हालचालींचा परिणाम दोन्ही देशांच्या संयुक्त घोषणेमध्ये झाला.या प्रकल्पात हॉटेल, इको-लॉज आणि एक मोठं व्हिजिटर्स सेंटर उभारण्याचं नियोजन आहे. तसंच त्यात जवळच्याच छोट्या विमानतळाचा विस्तार करणं आणि माउंट मोझेसला केबल कार सुरू करण्याचाही समावेश आहे.माउंट सिनाईला स्थानिक लोक जबल मुसा म्हणतात, याच ठिकाणी मोझेसला टेन कमांडमेंट्स दिल्याचं मानलं जातंइजिप्तचे गृहनिर्माण मंत्री शेरीफ एल-शेर्बिनी गेल्या वर्षी म्हणाले होते, या प्रकल्पामुळे पर्यटकांना सर्व प्रकारचं पर्यटन आणि मनोरंजनाच्या सेवा उपलब्ध होतील. त्यात सेंट कॅथरीन शहर आणि त्याच्या अवतीभोवतीच्या परिसराच्या विकासाला चालना मिळेल.हा विकास करत असताना तिथल्या नैसर्गिक भूप्रदेशातील पर्यावरण, दृश्यमानता आणि वारशाचं स्वरुप जतन केलं जाईल. तसंच सेंट कॅथरीनच्या प्रकल्पांवर काम करणाऱ्यांसाठी निवासाची व्यवस्था केली जाईल.

निधीच्या कमतरतेमुळे तात्पुरत्या स्वरुपात का होईना या प्रकल्पाचं काम थांबलेलं दिसल असलं तरीदेखील सेंट कॅथरीन मठाच्या पार्श्वभूमीवर एल-राहाचं मैदानाचं स्वरूप आधीच बदललं आहे. नवीन रस्त्यांचं बांधकाम सुरू आहे.मोझेसचे अनुयायी म्हणजे इस्रायली माउंट सिनाईवर इथेच त्याची वाट पाहत थांबले होते असं म्हटलं जातं. टीकाकार म्हणतात की या बांधकामांमुळे या भागातील नैसर्गिक वैशिष्ट्यं नष्ट होत आहेत.या जागेचं अद्भुत जागतिक मूल्याचं तपशीलवार वर्णन करताना युनेस्कोनं नमूद केलं आहे की कशाप्रकारे याच्या सभोवतालचा खडकाळ डोंगराळ प्रदेश...मठासाठी एक परिपूर्ण पार्श्वभूमी तयार करतो.त्यात म्हटलं आहे, या ठिकाणातून एका बाजूला निसर्ग सौंदर्य आणि त्याची अलिप्तता आणि दुसऱ्या बाजूला मानवाची अध्यात्मासाठीची कटिबद्धता यांच्यातील घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न दिसून येतो.२०२३ मध्ये, युनेस्कोनं या प्रकल्पासंदर्भातील त्यांची चिंता व्यक्त केली. तसंच हा प्रकल्प थांबवण्याचं, त्याचे परिणाम लक्षात घेण्याचं आणि या भागाच्या संवर्धनाची योजना तयार करण्याचं आवाहन इजिप्तला केलं.

जुलै महिन्यात, वर्ल्ड हेरिटेज वॉचनं एक खुलं पत्र पाठवलं. त्यात युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीला सेंट कॅथरिनचा परिसराचा समावेश धोक्यात असलेल्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत करण्याचं आवाहन करण्यात आलं होतं.सेंट कॅथरीन फाउंडेशनचे संरक्षक म्हणून याच्या संवर्धनाची मागणी करणाऱ्यांनी किंग चार्ल्स यांनादेखील संपर्क केला आहे. हे फाउंडेशन, मौल्यवान प्राचीन ख्रिश्चन हस्तलिखितांचा संग्रहासह मठांच्या वारशाचं जतन आणि अभ्यास करण्यासाठी निधी उभारतं.किंग चार्ल्स यांनी हे स्थळ म्हणजे, एक महान अध्यात्मिक खजिना असून ते भावी पिढ्यांसाठी जतन केलं पाहिजे, असं म्हटलं आहे.इजिप्तच्या अद्वितीय इतिहासाबद्दल असंवेदनशील असल्याची टीका होणारा हा काही इजिप्तमधील पहिलाच मेगा-प्रकल्प नाही.मात्र इजिप्तचं सरकार त्यांच्या भव्य योजनांची मालिका ही देशाच्या ढासळणाऱ्या अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी महत्त्वाची असल्याचं मानतं.

इजिप्तमधील पर्यटन क्षेत्र एकेकाळी भरभराटीला आलेलं होतं. मात्र कोरोनाच्या संकटाचा मोठा फटका या क्षेत्राला बसला होता. त्यातून सावरत असतानाच गाझामधील क्रूर युद्ध आणि प्रादेशिक अस्थैर्याच्या नवीन लाटेचा फटका या क्षेत्राला बसला आहे.इजिप्तमध्ये एकापाठोपाठ एक आलेल्या सरकारांनी, स्थानिक बदायून समुदायांशी विचारविनिमय न करता माउंट सिनाईचा व्यावसायिक विकास केला आहे.१९६७ च्या पश्चिम आशियातील युद्धाच्या वेळेस इस्रायलनं हा द्वीपकल्प ताब्यात घेतला होता. त्यानंतर १९७९ मध्ये इजिप्त आणि इस्रायलमध्ये शांतता करार झाल्यानंतरच हा प्रदेश इजिप्त परत मिळाला होता.लाल समुद्रातील इजिप्तच्या लोकप्रिय ठिकाणांच्या बांधकामाची सुरुवात १९८० च्या दशकात दक्षिण सिनाईमधून झाली. यात शर्म एल-शेखचा समावेश होता. या गोष्टीशी सेंट कॅथरीनच्या परिसरात सध्या जे होतं आहे, त्याच्याशी अनेकांना साम्य दिसतं.बदायून हे या प्रदेशातील लोक होते. ते गाईड, कामगार आणि भाड्यानं काम करणारे लोक होते, असं इजिप्तमधील पत्रकार मोहम्मद साब्री म्हणतात.मग औद्योगिक पर्यटन आलं आणि बदायून समुदायाला बाजूला सारण्यात आलं. त्यांना फक्त उद्योग-व्यवसायातूनच बाहेर काढण्यात आलं नाही, तर समुद्रातून प्रत्यक्षपणे या समुदायाला मागे रेटण्यात आलं, असं ते पुढे म्हणतात.

ज्याप्रमाणे लाल समुद्रातील ठिकाणांवर काम करण्यासाठी इजिप्तच्या इतर भागातील लोकांना कामासाठी आणण्यात आलं होतं. त्याचप्रमाणे सेंट कॅथरिनच्या प्रकल्पावर काम करण्यासाठी आणलं जाईल अशी अपेक्षा आहे.मात्र इजिप्त सरकारचं म्हणणं आहे की ते बदायून समुदायाच्या निवासी भागांमध्येदेखील 'सुधारणा' करत आहेत.सेंट कॅथरीनच्या मठानं गेल्या दीड हजार वर्षांच्या कालखंडात अनेक मोठाल्या उलथापालथींना तोंड दिलं आहे. मात्र जेव्हा या ठिकाणावरील सर्वात जुने संन्यासी जेव्हा तिथे स्थलांतरित झाले, तेव्हा ते अजूनही एक दुर्गम ठिकाण होतं.लाल समुद्रातील रिसॉर्टच्या विस्तारामुळे गर्दीच्या वेळेस इथे दिवसा सहलींसाठी हजारो यात्रेकरू येत असल्यामुळे परिस्थिती बदलण्यास सुरुवात झाली.अलीकडच्या काही वर्षांमध्ये, जळालेल्या झुडुपांच्या अवशेषांना किंवा कोडेक्स सिनायटिकसमधील पानं प्रदर्शित करणाऱ्या संग्रहालयाला मोठ्या संख्येनं लोक भेट असतात.कोडेक्स सिनायटिकस ही नव्या कराराची (न्यू टेस्टामेंट) जगातील सर्वात जुनी, जवळपास पूर्ण अशी हस्तलिखित प्रत आहे.आता, जरी मठ आणि या स्थळाचं मोठं धार्मिक महत्त्व कायम राहिलं तरीदेखील, त्याच्या अवतीभोवतीचा परिसर आणि शतकानुशतकं चालत असलेली जीवनशैली किंवा जीवनपद्धती कायमस्वरुपी बदलणार असं दिसतं आहे.

---

पान १ वरून

## सीरतुन्नबी प्रश्नोत्तरी

सोहळा द्वारे करण्यात आला. त्यांना पत्नीसमवेत शाल, मानपत्र व मोमेंटो देऊन गौरविण्यात आले.

शिक्षक व हुशार विद्यार्थ्यांचा सन्मान

परीक्षांच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या २० शिक्षकांना प्रशस्तिपत्रे व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. दहावीमध्ये विशेष यश मिळवणाऱ्या दोन हुशार विद्यार्थिनींना देखील प्रशस्तिपत्रे व पदक देऊन सन्मानित केले गेले. अक़ाब रिलीफ फाउंडेशन, बीड च्या सदस्यांनी अथक मेहनत घेऊन समारंभात चार चांद लावले. यशस्वी आयोजनामध्ये विशेषत:मोहमद इलियास सर एहसान सुदागर, फ़ैज़ान अली बागे, इंजिनियर सफ़ियान, मोमिन आमेर, शेख एहतशाम, शेख शाजेन महमद फारेस अब्दुल सबुर हारेस अन्सारी मुश्ताक भाई आणि इतर सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचा उत्साही समारोप

समारंभास एक हजाराहून अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते. अखेरीस मुहम्मद इलियास सर यांनी आभार मानले व कार्यक्रमाचा समारोप झाला.

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक

माफीची मागणी बीड जिल्हा एनएसयूआय च्या वतीने जिल्हाधिकारी यांना करण्यात आली. यावेळी एनएसयूआय चे जिल्हा अध्यक्ष अविनाश डरफे, महाराष्ट्र काँग्रेचे सरचिटणीस दादासाहेब मुंडे, प्रदेश सचिव गणेश राऊत, युवा नेते राहुल टेकाळे, छडणख प्रभारी असदुद्दीन शेख तालुका अध्यक्ष गणेश बाजगुडे, गणेश जवकर संतोष निकाळजे, मुकुंद लोणकर, संतोष गाडे बबलू जगताप शाम डरफे संतोष मते,रोहित घोडके,रोहन साळुंके अतिश घोलप, व छडणख चे पदाधिकारी उपास्थित होते.

## अलखैर फाऊंडेशनला

शासकीय सेवेत रुजू झाले आहेत. गरजूंना व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती दिली जाते. प्रत्येक वर्षी रक्तदान शिबीर आयोजित करते यात प्रत्येक वेळी २०० पेक्षा जास्त रक्तदान केले जाते. दर वर्षी उन्हाळ्यात ४ चार महिने दोन ते तीन ठिकाणी पाणपोई केंद्र ठेवले जाते. हे सर्व कार्य पाहून उकाब फाऊंडेशन कडून पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड फैज सर इस्लामिक रिसर्च यांचे हस्ते अलखैर फाऊंडेशनला खादीम - ए- मिल्लत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी अलखैर फाऊंडेशन चे अध्यक्ष अझहर इनामदार साहेब व उपाध्यक्ष मोमीन रझिउद्दीन सर, शेख रफत सर शेख तय्यब साहेब, अदनान खान सर, शहेबाज पठाण, आमिर खान उपस्थित होते.

## मुस्लिम समाजाने

कौतुक केले. जातीयतेचे राजकारण करून समाजात विष पेरणाऱ्यांना या भाईचाऱ्याने चपराक दिली आहे. आज बीड जिल्ह्यात चर्चा फक्त एकच धर्म वेगळा असला तरी माणूस एकच आहे, आणि संकटाच्या वेळी साथ देणे हीच खरी ईशरभक्ती आहे. पूरग्रस्त गावातून गावकऱ्यांनी हाजी जुबेर भाई यांचा सत्कार केला आहे.यावेळी शेख खलील मामु, सरपंच भास्कर गवते, सरपंच अभिमान कर्वे,शेख जावेद,शेख अमीन, उपस्थित होते या मदत कार्यात सहकारी शेख खदीर ,उर्फ खालू.,शेख अजीम धन्ना. सय्यद शरीफ, शेख शोएब, शेख जोहेब, शेख जुनेद, सय्यद इम्रान,अबूबकर पठाण, सय्यद आमेर, शेख शफीक, शेख मोहसीन, शेख नासेर, शेख सलमान, सय्यद सिद्दिक, शेख सोनू, नदीम शेख, सैफ शेख, समीर शेख, जैद शेख, शहेबाज शेख, सोहेल शेख, मुस्तकीम शेख, मोहजीब, इत्यादी समाजसेवक सहभागी झाले होते.

## पठाण अय्युब खान

सलीम हे देखील उपस्थित होते. त्यांच्यासह स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि इतर मान्यवरही या प्रसंगी उपस्थित राहून अय्युब खान कुटुंबियांच्या दुःखात सहभागी झाले. आमदार संदीप क्षीरसागर यांनी या प्रसंगी बोलताना, अय्युब खान यांचे समाजकार्यातील योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या पत्नींचे निधन हा मोठा धक्का आहे. कुटुंबाला धैर्य लाभो, दिवंगत आत्म्यास शांती लाभो, हीच प्रार्थना अशा भावना व्यक्त केल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश प्रवक्ते लोकपत्रकार भागवत तावरे यांनीही अय्युब खान यांची भेट घेऊन सांत्वन केले. दरम्यान, चुन गल्ली परिसरात व समाजातील विविध स्तरांमधून अय्युब खान यांच्या पत्नींच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.

## दोषी अधिकाऱ्यांवर

अनेक सुविधा अपुर्ण आहेत, वाहतुक भत्ता शिल्लक मिळाले नाही, वाढीव कुटूंबांचा प्रश्न सुटला नाही, सानुग्राह अनुदान व भुखंडापासुन अनेक गावकरी वंचित असल्याचा आक्रोश पुरग्रस्थांनी केला. यावेळी युवा नेते सुजात आंबेडकर म्हणाले की, वंचित बहुजन आघाडी पुरग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा उभारणार, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई साठी न्यायालयीन लढाई लढण्याची ग्वाही दिली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुका समन्वयक अ‍ॅड.संजय भारदे, भारतीय बौध्द महासभा तालुकाध्यक्ष गंगाधर सोंडारे सह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

पान १ वरून

## कोण होणार

उमेदवारी मिळावी यासाठी लॉबिंग करत आहेत.

सोमवारी सकाळीच आरक्षणाची सोडत होणार आहे. राज्यातील २४७ नगर परिषद व १४७ नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण निश्चितीसाठी आरक्षणाची सोडत होणार आहे. जिल्ह्यात सर्वात जास्त चर्चा बीड नगर पालिकेची असून या नगर पालिकेचा नगराध्यक्ष होण्यासाठी सर्वात जास्त चुरस अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आहे. या पक्षाकडून बीडचे माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभुषण क्षीरसागर यांचे चिरंजीव सेवाकृत नगरसेवक डॉ.योगेश क्षीरसागर, बीड नगर पालिकेचे विद्यमान गटनेते फारूक पटेल, नगरसेवक अमर नाईकवाडे, विनोद मुळूक, शेख निजाम, शेख तय्यब हे इच्छूकांच्या यादीत आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कोण इच्छूक आहे याचा आतापर्यंत थांगपत्ता लागलेला नाही. एमआयएमकडून अ‍ॅड.शेख शफिक , अब्दुल सलाम शेठ, शेख मतीन हे इच्छूक आहेत. भारतीय जनता पार्टीकडून सलिम जहाँगिर, नवनाथ शिराळे, अशोक लोढा यांच्या नावाची चर्चा आहे. उबाठाकडून आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून कोणाचेच नाव समोर आले नाही. तर अपक्ष म्हणून अनेक जण तयारीला लागले असल्याचीही चर्चा होत असून काँग्रेस पक्षाकडूनही कोणीच नसल्याचे वातावरण ही सध्या बीडमध्ये दिसून येत आहे. आता सोमवारीच निर्णय होईल कोण होणार बीडचा नगराध्यक्ष?

## शेतकरी पतीच्या

मदतनिधी व शासनाच्या 'लाडकी बहीण योजना'अंतर्गत मिळणारे मानधन तसेच मजुरीची रक्कम चौसाळा येथील पोस्ट पेमेंट बँकेच्या खात्यामध्ये जमा होत असे.मात्र, सप्टेंबर महिन्यात त्यांच्या मोबाईलचे

सिमकार्ड अचानक बंद पडल्याने त्या काळात अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या नावावरचे सिमकार्ड सक्रिय करून बँक खात्यातील रक्कम परस्पर हस्तांतरित केली. ३ सप्टेंबर ते ६ सप्टेंबर या झालेल्या सात

व्यवहारांतून त्यांच्या खात्यातून एकूण १ लाख ३३ हजार ९९५ रुपये काढून घेण्यात आले.

दरम्यान, शेतामध्ये खत पेरणीसाठी पैसे काढण्यासाठी त्या बँकेत गेल्या असता खात्यामध्ये रक्कम नसल्याचे त्यांना समजले. तुमच्या सोबत ऑनलॉईन फसवणुक झाली असून रक्कम विविध ठिकाणी गेली असल्याचे बँकेतून त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी नेकनूर पोलीस ठाणे गाठून प्राथमिक तक्रार दिली. या प्रकरणात मिनाक्षी आंधळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बीडच्या सायबर ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. पतीच्या मृत्यूनंतर कसेबसे स्वतःला सावरून मुलांचा सांभाळ करणाऱ्या शेतकरी महिलेसमोर या घटनेनंतर अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे.

## पोलीस दुसऱ्याची ब

शिवाजी नगर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. मात्र नेहमीप्रमाणे शिवाजी नगरपोलिसांनी आमच्याकडे काही दाखल नाही म्हणत या घटनेवर भाष्य करणे टाळले.

याबाबत अधिक असे की, आज दुपारी १२ ते १ वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर एक चारचाकी गाडी मध्ये पोलिसासह एक महिला फिरतांना महिलेच्या पतीला दिसले. सदरची गाडीचा क्रं. उपलब्ध आहे. मात्र तो या ठिकाणी आम्ही देत नाहीत. अवैध पध्दतीने त्या गाडीमध्ये पोलीस नावाची पाटी ठेवण्यात आलेली आहे. जेव्हा नवर्याने शिवाजी महाराज चौकात अडवली तेव्हा त्या ठिकाणी प्रचंड राडा झाला. बघ्याची गर्दी वाढली. त्यामुळे काही काळ या भागातील वाहतुक ठप्प झाली. या प्रकरणी पोलिसांत काही दाखल की नाही ? या बाबत शिवाजी नगर पोलिसांकडे माहिती उपलब्ध नाही. परंतुया घटनेने पोलिसांच्या चारित्र्यासह वाहतूक कोंडी आणि चर्चा मात्र बीड शहरात चांगलीच रंगली.

## तुझ्यामुळे अजित पवार

घेतलं? कशाला लोकांच्या काड्या करतात. बीड जिल्ह्यातले मराठ्यांचे लोक आता आणखी शहाणे होतील. तुम्ही मला काय बोलता. आम्हाला ओबीसीचा खायचं तर तू कशाला बंजारा समाजाचे खातो? तू माझ्या नादी लागू नको. शहाणपणा करायचा नाही. तू तिकडे नीट राहायचं. रक्ताने हात माखलेल्यांनी माझ्या जातीवर बोलायचे नाही, तुम्ही रक्ताने हात माखलेल्यांचे प्रश्नही विचारु नका असे त्यांनी म्हटले आहे. त्याचसोबत तु माझ्या नादाला लागू नको नाहीतर तुझ राजकारणातलं नामोनिशान संपेल. असाही इशारा यावेळी त्यांनी दिला आहे.

तुझ्यामुळे अजित पवारांचा पण कार्यक्रम लावीन

तू जर इथून पुढे माझ्या नादी लागला तर मी सांगतो मी दोघांचाही बाजार उठवेन. तुझ्यामुळे मी अजित पवारांचा सुद्धा कार्यक्रम लावेन. मी जातीला इतका कट्टर मानणारा आहे की तुम्ही काहीच नाहीत. मी ऐकून घेत आहे म्हणजे शहाणपणा करायचा नाही. तो आता ज्याच्या प्रचाराला येईल ती सीट आता आम्ही पाडतो. मग ते मराठ्यांचा असला तरी चालेल, असे आव्हान मनोज जरांगेंनी धनंजय मुंडें यांना दिले.

## गेवराईत शेतकऱ्याने

प्रपंच चालवत असताना बुधवारी सकाळीच त्याचा राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला.

कुटुंबीयास मोठा धक्का बसला. दरम्यान, संतोष चोपडे याने मंगळवारी रात्री गळफास घेतल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. मात्र, मृत संतोष यांने कर्ज घेतल्याची माहिती त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी दिली. मृत संतोष चोपडे याच्या पश्चात्य आई, पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे.